# भारतीयांचे तब्बल २४.५ लाख कोटी रुपये विदेशात

नवी दिल्ली -(सी.एन.आय) भारतीयांचा तब्बल २४.५ लाख कोटी रुपये एवढा काळा पैसा विदेशात असल्याची खळबळजनक माहिती आज (सोमवार) केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) संचालकांनी दिली. विदेशातील बँकांमध्ये बेहिशोबी मालमत्ता ठेवण्यात भारतीय वरचढ असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

मॉरिशस, स्वित्झर्लंड, लिचटेनस्टेन आणि ब्रिटिश व्हर्जिन आयर्लंड या देशांमधील बँकांमध्ये भारतीयांनी मोठया प्रमाणावर बेहिशोबी मालमत्ता ठेवली आहे. भ्रष्टाचार विरोधी आणि बेहिशोबी संपत्तीची वसुली यावर आयोजित करण्यात आलेल्या इंटरपोलच्या पहिल्या जागतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन सीबीआयचे संचालक ए. पी. सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले,''विदेशातील बँकांमध्ये भारतीयांनी सुमारे २४.५ लाख कोटी रुपये एवढा काळा पैसा गुंतविला आहे. स्विस बँकांमधील गुंतवणूकदारांमध्ये भारतीयांचा पहिला क्रमांक आहे. काळ्या पैशांची माहिती मिळविणे ही अतिशय वेळखाऊ प्रक्रिया आहे. ज्या देशांमध्ये हा पैसा गुंतविण्यात आला आहे तेथील प्रत्येक कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी बराच विलंब लागतो.''

ए. पी. सिंह म्हणाले,''ट्रान्स्परसी इंटरनॅशनल इंडेक्सनुसार जगातील ज्या ५३ टक्के देशांमध्ये भ्रष्टाचार कमी आहे तेथेच जगभरातील भ्रष्टाचाराचा पैसा गुंतविला जात असल्याचे वास्तव आहे. कमी भ्रष्टाचार असलेल्या देशांमध्ये न्यूझीलंड प्रथम क्रमांकावर, सिंगापूर पाचव्या क्रमांकावर तर स्वित्झर्लंड सातव्या क्रमांकावर आहे. मात्र तेथेच सर्वाधिक काळा पैसा गुंतविण्यात येत आहे. काळा पैसा शोधणे, गोठविणे, जप्त करणे आणि देशात परत आणणे एक मोठे आव्हान आहे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि तज्ज्ञ लोकांची गरज आहे.''

''वेगवेगळ्या देशातील तपास यंत्रणांच्या मर्यादांचा लाभ उचलत गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक आपली गुन्हेगारी वाढवीत आहेत. दोन देशांमधील गुन्ह्यांमध्ये वाढ करून त्यातून मिळालेला पैसा तिसऱ्या देशात गुंतविला जात आहे. टूजी स्पेक्ट्रम, कॉमनवेल्थ गेम्स आणि मधू कोडा या प्रमुख गैरव्यवहारांचा तपास सीबीआयकडे होता. त्यातील बेहिशोबी पैसा सुरवातीला दुबई, सिंगापूर आणि मॉरिशसला गेला. त्यानंतर तो अतिशय पद्धतशीरपणे स्वित्झर्लंड आणि इतर देशातील बँकांमध्ये गुंतविण्यात आल्याचे दिसून आले.''